# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. 06/09/2017

## प्रेस नोट

## अवैधरीत्या चाकु बाळगणारा अटकेत.

दि.06.09.2017- मुकुंदवाडी पोलीस स्टेशनचे पो.उप.नि संजय बनसोड व त्यांच्या पथकाने संतोषीमातानगर, संतोषीमाता विसर्जन विहिरीजवळ विसर्जनाच्या वेळी अवैधरीत्या चाकु बाळगणाऱ्या इसमास अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीचे नाव रामराव शंकरराव पाडागळे वय-35 वर्ष रा. चिकलठाणा औरंगाबाद असे आहे. मुकुंदवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांनी अधिक माहिती देताना सांगितले कि, पो.उप.नि संजय बनसोड व स्टाफ हे गणेश विसर्जनाच्या बंदोबस्ताकामी संतोषीमातानगर येथे विसर्जन विहिरीवर बंदोबस्त करीत असताना एक इसम संशयास्पद रीतीने वावरताना आढळून आल्याने त्यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता तो उडवा-उडवीचे उत्तरे देत होता. त्याच्याकडे अधिक विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव रामराव शंकरराव पाडागळे वय-35 वर्ष रा. चिकलठाणा औरंगाबाद असे सांगितले. पोलिसांनी त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या खिशात एक खटक्याचा चाकु अंदाजे किंमत 500 /- रु मिळून आल्याने सदर चाकु ताब्यात घेण्यात आला. पोलीस शिपाई लक्ष्मण पांडुरंग राठोड यांनी सरकारतर्फे फिर्याद देऊन आरोपीविरुद्ध मुकुंदवाडी पोलीस स्टेशन येथे कलम 4,25 भारतीय हत्यार कायद्यासह कलम 135 महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वे कारवाई करण्यात आली. ही कारवाई मुकुंदवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शिवाजी कांबळे, पो.उप.नि संजय बनसोड, पोना. गोकुळ जाधव, पोकॉ. लक्ष्मण राठोड, गीते यांनी केली.

# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर
डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)


दि. 06/09/2017

**प्रेस नोट**

## गुन्हे शाखेने बेकायदेशीर दारू विक्री करणाऱ्यास केले जेरबंद.

दि.06.09.2017:- गुन्हे शाखेने खबऱ्यामार्फत मिळालेल्या माहितीवरून बजाजनगर मधील वृंदावन हॉटेल जवळ, आनंद मेडिकल च्या बाजूला येथे दोन मोपेड मोटारसायकल वर विदेशी दारूच्या बाटल्या डिक्कीत ठेवुन विकणाऱ्यावर छापा मारून 63,700/- रु. किंमतीचा मुद्‌देमाल आरोपी नामे धनुष सुरेश गोडा, वय- 20 वर्ष, रा. बजाजनगर, औरंगाबाद याच्याकडून जप्त करण्यात आला आहे. गुन्हे शाखेकडून अधिक माहिती मिळाली कि पोलीस उप निरीक्षक अनिल वाघ व स्टाफ यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली कि बजाजनगर मधील वृंदावन हॉटेल जवळ, आनंद मेडिकल च्या बाजूला एक काळ्या रंगाचा टी-शर्ट घातलेला इसम त्याच्या जवळील दोन मोपेड गाड्यांच्या डिक्कीत विदेशी दारू ठेऊन त्यांची चोरटी विक्री करीत आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरून गुन्हे शाखेचे पो.उप.नि. अनिल वाघ व त्यांच्या पथकाने त्याठिकाणी छापा मारून आरोपी नामे धनुष सुरेश गोडा, वय- 20 वर्ष, रा. बजाजनगर, औरंगाबाद यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्या ताब्यातून दोन मोपेड मोटारसायकल किंमत 60,000/- रु., 16 विदेशी दारूच्या बाटल्या किंमत 3,560/-रु. व त्याच्याकडील रोख रक्कम 140 रु असा एकूण 63,700/- रुपयांचा मुद्‌देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हे शाखेचे पोना. भगवान शिलोटे यांनी सरकार तर्फे फिर्याद देऊन नमूद आरोपीविरुद्‌ध MIDC वाळूज पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम 65 (ख) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मधुकर सावंत ,पो.उप.नि अनिल वाघ, पोलीस हवालदार नितीन मोरे, पोना. भगवान शिलोटे, पोकॉ. संजय खोसरे यांनी केली.

# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर
डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)


दि. 06/09/2017

**प्रेस नोट**

## हर्सूल पोलीस स्टेशन येथे पोलीस आयुक्त यांचा जनता दरबार.

दि.06.09.2017 :- हर्सूल पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात जनतेच्या तक्रारीचे जागीच निवारण करण्यासाठी पोलीस आयुक्त यशस्वी यादव हे उदया दि.07/09/2017 रोजी 13.00 वाजता गजानन महाराज मंदिर, हर्सूल पोलीस स्टेशनच्या बाजूला " नागरिक व पोलीस संभेलन " या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमास तक्रारदार, पोलीस मित्र, स्थानिक लोकप्रतिनिधी व शांतता समितीचे सदस्य हे सुद्धा या उपस्थितीत राहणार आहेत. या कार्यक्रमास नागराकांनी व प्रसार माध्यमांनी उपस्थित रहावे असे कळविण्यात येते. अशी माहिती हर्सूल पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक मनीष कल्याणकर यांनी दिली.

# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. 06/09/2017

**प्रेस नोट**

## श्रींची विसर्जन मिरवणूक शांततेत संपन्न

दि.06.09.2017 :- काल दि. 05.09.2017 रोजीची श्री गणपती विसर्जन मिरवणूक शहरात मोठ्या उत्साहात पार पडली. संपूर्ण मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. औरंगाबाद शहरामध्ये मानाचा समजला जाणारा संस्थान गणपतीची विसर्जन आरतीला मा.आ.हरिभाऊ बागडे विधानसभा अध्यक्ष, मुंबई, मा.खा.चंद्रकांत खैरे, पोलीस आयुक्त यशस्वी यादव यांच्या समवेत इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच श्रींचे भक्तजन उपस्थित होते. संस्थान गणपतीची विसर्जन आरती झाल्या नंतर या ड्रोनच्या साहयाने बाप्पाच्या मूर्तीवर पुष्प अर्पण करण्यात आले. तसे बाप्पाच्या भक्तांवर सुगंधी अत्तरचा वर्षाव करण्यात आला. विशेष बाब म्हणजे पोलीस आयुक्त यांच्या संकल्पनेतून प्रथमच गणेश विसर्जन उत्सवात गुन्हेगारीला आळा बसण्यासाठी ड्रोन कमेऱ्याचा उपयोग करण्यात आला. तसेच या विसर्जन उत्साह दरम्यान 1000 विशेष पोलीस अधिकारी व NSS विद्यार्थी यांच्या मदतीने बाप्पाचे विसर्जन शांततेत पाडण्यात आले. या वर्षी बाप्पाच्या विसर्जन मिरवणुकीसाठी ठिकठिकाणी मोठ्याप्रमाणावर पोलिसांचा चोख बंदोबस्त लावण्यात आला होता तसेच या विसर्जन मिरवणुकीवर ड्रोनच्या साहयाने गुन्हेगारावर नजर ठेवण्यात आली होती. यामुळे यावर्षी गणेश विसर्जन उत्साहात कोणतेही विघ्न आले नाही. औरंगाबाद शहरामध्ये श्रींचे विसर्जन शांततेत पार पडले.

स्वाक्षरीत/-
(रामेश्वर थोरात)
सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)
औरंगाबाद शहर